R.I. Dist. 3131 | Club No. 31609

CELEBRATING 25 YEARS 1996 - 2021 Rotary Club of Pune Katraj 2021 - 22

## Rotary Club of Pune Katraj

Rotary

# DARPAN

SERVE TO CHANGE LIVES

Issue No. 6
Monday, 13th December 2021

President : Rtn. Pushkaraj Mulay
Secretary : Rtn. Rupali Bajaj

Editor :
Rtn. Pradeep & Ketki Sindekar




## Disease Prevention & Treatment Month

We meet every Saturday at 8 pm

## संपादकीय

डिसेंबर. ग्रेगरियन कॅलेंडर चा शेवटचा महिना. गेली दोन वर्ष करोना महामारीने जगभर उत्पात माजवला आहे. कर्म धर्म संयोगाने मागच्या शताब्दीच्या याच दुस–या दशकात अशाच जागतिक साथीने जीवन उध्वस्त केलं. रोटरी संस्थेनं तोही काळ पाहिलाय. म्हणूनच रोटरीत डिसेंबर महिना रोग प्रतिबंधक महिना या रुपाने साजरा केला जातो. वंचित शोषितांच्या जीवनात आरोग्याची ऊब रहावी या रोटरीच्या उद्देश्याला धरून वेगवेगळे क्लब्ज आपली सेवा उपक्रमांची आखणी व संचालन करत असतात. आपल्याही क्लबने दुर्लक्षित 'वाणी व्यंग' सुधारणा स्तुत्य उपक्रम आयोजित केला आहे. यासाठी ग्लोबल ग्रांट मिळवण्याचं शिवधनुष्य मीनाताई घळसासी यांनी पेललं आहे. या उपक्रमाच्या संकल्पनेत सामील असलेल्या टीम आर सी पी के व प्रे. रो. पुष्कराज व त्याच्या सर्व टीमचं मनःपूर्वक अभिनंदन. पुष्कराजच्या वर्षाचं अजून एक ठळक वैशिष्ट्य आहे. त्यानं आतापर्यंत आयोजित प्रत्येक कार्यक्रम हा अतिशय देखणा, रोचक व ज्ञान व रंजन याचा लाभ देणारा ठरलाय. यापुढेही तो असाच पायंडा चालू ठेवेल अशी खात्री वाटते.

चला तर मग सर्व रोटरी सदस्यांनो आपण प्रत्येक सभेला उपस्थित राहून ज्ञान, रंजन व सेवा महायज्ञात सहभागी राहूया.

**भवदीय**
**संपादक मंडळ**
**रोटरी दर्पण**
**आर सी पी के**
**प्र के**

## Global Grant Recognition




## CSR India Grant Recognition




## Presidential Message



I trust that, the just concluded Diwali festival has brought happiness in your family.

Friends, five months of RY 2021-22 are over and we are marching ahead with vibrant year. With the offline meetings started again, I am happy to note the participation by most of the members in the club meetings.

November was designated as the Foundation month, and I am glad to share that we have received an approval for our Global Grant project Saksham 2.0 Speech and Voice Disorder & Rehab Clinic at Sasoon General Hospital, Pune.

It is a memorable moment and a dream come true for all of us that we will be able to improve the lives of the less privileged in our community, who are having voice and speech disorders. It was a dream that kept me awake for the last one year since this project was conceptualised and after lots of up and downs this project is finally sanctioned. I humbly salute the efforts of all the stake holders in this project, especially Rtn. Meenatai who was a guiding light all throughout the journey. Let us now all contribute generously for this project and make it a reality.

We should also be proud that Rtn. Vibhakar Ramtirthakar has recently achieved the Major Donor Level 1 of The Rotary Foundation. It is only due his consistent contributions over the years that this was possible. Let us follow his foot steps and try to attain the level for all the club members.

The recently formed Nomination committee has met frequently over the last week to deliberate and select most eligible candidate for the Club President's post for the year 2022-23 & 2024-25. I am happy to share that Rtn. Namita Naik has been selected as President for RY 2022-23 and Rtn. Sameer Prabhune as President for RY 2024-25. I congratulate both of them for the appointment and wish them a successful presidential tenure.

After a successful 'Swar-Sandhya' program, the admin team is again back in action with a plethora of events for the month of December. Annets nite and Christmas celebrations are planned by them in a very unique way this year.

Friends, let us all contribute to the club in every possible manner. Together we can & together we will take our club to new heights in the Rotary world in all respects.

**Rtn. Pushkaraj Mulay**

## प्रतिकार

दहावीचे दिवस. रात्रीचे साडे आठ. क्लासहून घरी परतायची वेळ. सायली स्वप्नाली आपापल्या सायकल वरुन घरी निघाल्या. सायलीचे बाबा फ्लाईट लेफ्टनंट सौरभ परांजपे सुटीवर घरी यायचे होते. म्हणून सायलीला घरी जायची गडबड. सायकलवर टांग टाकून त्या रस्त्याला लागतायत तोवर मोटरसायकल वरुन दोन टपोरी पोरं त्यांच्या मागे अचकट विचकट शेरे बाजी करत येउ लागली. जाळीदार गोल टोपी घातलेला तरुण आपल्या पिळदार शरीराचे प्रदर्शन होईल असा टी शर्ट घालून गाडी चालवत होता. त्याच्या मागे बसलेल्या मुलाने शर्टाची बटने उघडी टाकली होती. त्यातून त्याच्या गळ्यातील जाड सोनसाखळी व उजव्या मनगटातील चमकते कडे सहज दिसत होते.रस्त्यावरचे दिवे इथे बंद होते. वस्ती विरळ होती. राजू काय रे काय म्हणतोस? चालकाने मागच्याला विचारले. वळ इथून डावीकडे! मागचा म्हणाला. ते वळले. सायली स्वप्नालीनं सुटकेचा निःश्वास टाकला. मोकळं होत स्वप्नाली म्हटली बरं झालं बाई कटकट टळली. आपण फक्त पोरी पोरीच, काय करणार या टारगटाना? सायली शांतपणाने म्हणाली काही नाही गं. तशी वेळचं जर आली असती तर काहीही केलं असतं. अगं काहीही काय करणार? आपल्याकडे काय कांही शस्त्र आहेत की कराटे प्रशिक्षण? स्वप्नाली.शस्त्र आणि प्रशिक्षण असेल तर छानच गं. पण माझे बाबा म्हणतात बेटी अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी पहिली गरज म्हणजे आत्मविश्वास! आणि हो उत्तम शस्त्र म्हणशील तर युध्दाच्या क्षणी जे उपलब्ध असेल ते घरी येताच सामान ठेवून चहा घेऊन लगेचच लेकीला सरर्प्राईज द्यावं म्हणून सौरभ त्याच्या गाडीवरुन निघाला. त्याला हेही माहीत होतं, रस्त्यात वस्ती एके ठिकाणी विरळ आहे. पण खरं तरं निघायला उशीरच झाला होता.त्या दोघी थोड्या पुढे जातायत तोवर दोघींचे डोळे समोरुन येणा-या गाडीच्या हेडलाइट मुळे दिपले व वेग कमी झाला. गाडी वेगात जवळ आली तशी सायलीने आपली सायकल डावीकडे घेतली पण तिच्याच उजवीकडून जाणा-या स्वप्नालीला जागा मिळेना म्हणून उजवा हात डोळ्यावर धरुन ती थांबली. अंधारातून सोन्याच कडं घातलेला हात आला. तिच्या छातीवर आदळला. त्या हातानं तिचा मानभंग केला व तोल जाउन ती पडली. गुटख्याच्या वासानं आणि रस्त्याच्या मातीनं तिच शरीर व मन मलिन झालं. अंधार दोघांच्या गडगडाटी हास्यानं नाहून निघाला. प्रचंड अपमान, तिरस्कार, असहायता, संताप, असुरक्षितता यानी स्वप्नाली थरथर कापत होती. सायलीचीही अवस्था फार कांही वेगळी नव्हती. चल रे फिरव गाडी. दुस-या कडक मालाची तपासणी करु! हे शब्द ऐकले मात्र, सायलीने फिरुन परत येणा-या गाडीकडे पाहिलं. ते वेगात होते. पोहोचलेच. क्षणाचाही विलंब न करता सायलीनं स्वतःची सायकल उचलली. आणि हर हर महादेव! अशी आरोळी मारतं ती मोटर सायकली वाल्यांवर तुटून पडली. गाडीवरुन पडलेल्या तरुणांच्या पायावर त्यांचीच गाडी आणि छाताडावर दोन्ही पायानी लत्ताप्रहार पदन्यास करत, नाचत सायली बेभानपणे ऊच्चरवाने ओरडत होती भारत की हम नारी है। फूल नही चिंगारी है। हम से जो टकराएगा, मिट्टी में मिल जाएगा।स्तिमित स्वप्नाली आणि सौरभने तिला त्यांच्या छाताडावरुन उतरवलं.

**प्रदीप सिंदेकर पुणे**

## संगीत

**संगीताचे महत्व व आवश्यकता**
**यगीतं वाद्यं तथा नृत्यम प्रथम संगीतम् उच्चयेत**

संगीत हे मुळातच सर्व सजीव सृष्टीसाठी असल्यामुळे मानवी जीवनात ते अतिशय लोकप्रिय आहे. संगीताच्या माध्यमातून विविध भावना व्यक्त केल्या जातात. सामाजिक स्तरावर सुद्धा संगीत हे माध्यम अतिशय महत्त्वपूर्ण आहे. संगीत लोकांना एकत्रित बांधून ठेवते. अनेक सण समारंभ, लग्नकार्य यामध्ये संगीत या कलेमुळे मनोरंजन तर होतेच तसेच भरपूर आनंदही मिळतो. संगीताला वैयक्तिक जीवनात पण खूपच महत्त्व आहे. जिथे शब्द कमी पडतात तिथे संगीत हे माध्यम खुप उपयोगी ठरते. स्वतःच्या भावना व्यक्त करण्यासाठी, सरळ सोप्या भाषेत सांगण्यासाठी संगीताचा उपयोग होतो. कोणतेही संगीत स्वतःच्या आनंदासाठी नक्कीच असते. श्रम कमी करण्यासाठी संगीत उपयुक्त ठरते. समूह गायनामुळे या कलेला सामाजिक जीवनात अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. समाजाला एकत्रित करण्यासाठी, समाज प्रबोधनासाठी संगीताच्या माध्यमातून स्फूर्ती मिळते. संगीत हे प्रत्येक माणसाच्या मनामनात रुजलेले असते. संगीत ही कला राष्ट्रीय प्रेरणा देणारी आहे.

धन्यवाद

**मुग्धा कुलकर्णी**

## जिवंततेचा तलाव

रंग नभीचे बदलून जाती
सकाळपासून सारे
रोज चांदणे उगवुन न्यारे
रोज वेगळे वारे

श्वासासंगे भरून घ्यावी
उर्जा जगण्यामधली
फेकून द्यावे काटे वेचुन
राखी पुष्पे नात्यांमधली

जाणून घेती शल्य कधी जे
वंचित होते म्हणुनि
दिसता अश्रू बांध घालण्या
सरसावति जे झणी

स्वप्ने तुटता सत्यामध्ये
ऊलता दोन कडी
अभावातून सहकाराने
फुलता दोन घडी

जिवंततेचा तलाव अवघा
अनुभूतीच्या लाटा
आनंदाचा भाव कधी
कधी सुखदःखाच्या वाटा

**प्रदीप सिंदेकर**

# Know Your Rotarian Family
## संकलन – ॲन विनया काळे



**Rtn. Dileep,** Bsc (Agri) has own business since 1986 and presently are Authorised Dealers of JCB, Earth moving Machines, spares and servicing in major district of Maharashtra with 12 offices and 450+ employees. Apart from successful businessman, he is keen listener of classical music who never miss concerts and animal lover as well. He has given service to Police Deptt. as external auditor of police dogs squad, to snake park & orphanage centre at Katraj zoo. His hobbies include Industrial/animal Photography.

**Ann Padma,** Bsc (Maths &Stat) looks after accounts of family business. Its her Mother-in-law who is BA(Sanskrit) and now 91 year old from whom she learned accounts, shares, income tax etc. who is still serving society by donating self knitted sweaters etc. Ann Padma too likes knitting, embroidery, cooking. She is also animal lover and compassionate to serve needy people.

They are blessed with **Annet Siddharth**.

**Siddharth**, BE (Industrial) looks after family Business. He too is animal lover and avid photographer. Happily married to **Neha**, MBA(Mktg) who is also in family business and has good hand in English literature. Both are health Freaks. They are blessed with one son **Shaurya**, studying in 5th std. with good academics who has earned good ranking in English-science Olympiad and is creative with good drawing.

RCPK is proud of This Versatile Family !!

**Rtn. Dileep Pandit**
**Joined in 2016**



**Rtn. Sameer**, Masters in Printing Engineering, 23 years Education experience, now has own packaging business and visiting faculty at MIT, VIT, Bharti Vidyapeeth. He has been awarded as best teacher, selected as India expert for training, candidate for international competition, Germany teacher training prog in printing and now recognized as Official trainer for India & State Govt. for packaging, printing and skill development. A versatile personality has hobbies of painting, sculpture, cooking, singing, music collection and attached to Comic Collection forum with own 20-25k comic collections including rare copies which has demand all over the world for reprinting.

**Ann Deepa**, M. Com looks after finance and admin of home business. She likes to travel and explore new places.

They are blessed with **Annet Omkar**.

**Omkar,** BE (Computer) is pursuing his masters in computer from Binghamton University, New York. He has liking of Bird photography, sound engineering, painting, cooking , music similar to Rtn. Sameer.

RCPK is proud of This Versatile Family !!

**Rtn. Sameer Prabhune**
**Joined in 2008**



Rtn. **Vivek**, B.COM, MBA, Ex- Circulation Head of Daily SAKAL, also worked for Sakal Social Foundation, Tanishka, Madhurangan has many feathers of achievements in his cap. He is presently working as Vice President of City Corporation. He has hobby of connecting to people and give hand of friendship. Likes to travel and is work alcoholic. A disciple of Datta Maharaj has philanthropic attitude towards his work and has faith that his noble profession of social work apart from Rotary like Kshudha shanti for aged, girl adoption etc. through Amanora foundation is due to God's wish.

**Ann Gauri,** B Com looks after home as her passion. She is very clam and patient and believes in positivity. Caring towards In-Laws, **Gauri**, backbone of Vivek always gives warm welcome to everyone.

They are blessed with **Annet Vaishnavi** and **Vaidehi**.

**Vaishnavi**, BCOM, MBA is working in HR of Zenith Private Company, Pune. She likes to help the needy and has devoted herself for many social works from school days. Learned Bharat Natyam and good Choreographer. Happily married to **Ajinkya Kulkarni**, BE, MBA, working in Pune based IT company. He loves Cricket and has expertism. They are blessed with one cute son **Vivan** of 19 days.

**Vaidehi**, BCA, MBA is working in private company and has been awarded star performer of the year. Dance is her passion and is good Choreographer.

RCPK is proud of This Versatile Family !!

**Rtn. Vivek Kulkarni**
**Joined in 2008**



**Rtn. Anant**, an Electronic Engineer with MBA has his own business M/s ANTECH Microsystem Pvt Ltd. since last 27 years for CAD, CAM, CNC Software Development, training and are channel partner for Siemens. He has been awarded as fastest programmer, FIE Foundation award, Award of Productivity Council etc. He has interest in farming, gardening, social work through ANTECH Foundation. He is workaholic and health freak. Biking is his hobby.

**Ann Manisha**, BA (Economics) is Director in ANTECH Group and was looking after administration. Now a perfect homemaker is good orator and has gardening hobby.

They are blessed with **Annet Adwaita** and **Aryan**

**Adwaita** and **Aryan**, both are pursuing their Studies and are active in social work. Adwaita and Aryan, both had international exposure through RYE.

RCPK is proud of This Versatile Family !!

**Rtn. Anant Tikone**
**Joined in 2011**






**Rtn. Namita Naik**

President for RY 2022-23



**Rtn. Sameer Prabhune**

President for RY 2024-25

## Thanks to Nomination Committee Members

Rtn. Ajit Kulkarni, Rtn. Abhay Bhise, Rtn. Dhananjay Hirwe, Rtn. Ram Kutwal, Rtn. Dr. Prabhakar Mahajan, Rtn. Milind Patil




**Achieved Major Donor Level 1**





## मी वयात आलो

मी दानशूर कर्णापासून ते आजवर अगणित कथा ऐकल्या. त्यामुळे लहानपणापासून मला इतरांना मदत करायची सवय लागली. माझ्या ऐपतीप्रमाणे मी देत आलो. पण माझी उडी ती केवढी ? मी रोटरीत आल्यापासून मला रोटरी फाऊंडेशनची माहिती झाली व मी दारवर्षी रोटरी फाऊंडेशनला काहीतरी देता गेलो. देता देता माझी पहिली पायरी यावर्षी पार पडली. याबाबतीत माझे आदर्श अनेक पण मी दोघांचा उल्लेख करतो. एक विनय व रश्मी कुलकर्णी. साधी राहणी, उच्च विचारसरणी, मैत्रीपूर्ण स्वभाव व रोटरी फाऊंडेशनला एवढी मदत. त्यांच्यामुळे मी प्रभावीत झालो.

दुसरी आपली अस्मिता पाटील. त्यांच्या कठीण आर्थिक परीस्थितीतही त्यांना फाऊंडेशनला द्यायचे असते. वा रे वा. त्यांची वृत्ती मला आवडली. या दोघांनाही मी वंदन करतो व इतरांनीही यापासून बोध घेऊन आपापल्या परीने फाऊंडेशनला मदत करावी ही माझी नम्र विनंती. फाऊंडेशनला दिलेली मदत सत्कारणी लागेल ही मला खात्री आहे. आपल्या क्लबने अनेक ग्लोबल ग्रेंट केल्यात त्या फाऊंडेशनच्याच बळावर. आता काहीतरी देऊयात. देणार ना !

**रो. विभाकर रामतीर्थकर.**

# रम्य हा क्लब – गुज गोष्टींची मैफिल
# Family of Rotary

**शब्दांकन –ॲन विनया काळे**

## रोटेरियन मिलींद कुलकर्णी

आम्ही कुलकर्णी परिवार २००२-०३ मधे रोटरी क्लब ऑफ पुणे कात्रजला जोडले गेलो. त्या वर्षी राम कुतवळ अध्यक्ष होते.आम्हाला कै. डॉ.आर. पी. जोशीसरांनी क्लब मधे आणले.

तेव्हापासून आज पर्यंत दरवर्षी रोटरीच्या विविध उपक्रमांमध्ये आम्ही सहभागी झालो आहोत. वेगवेगळी पदेही भूषवली. तरीही कात्रज क्लबचा मेंबर म्हणून पहिल्या वर्षीची गोडी आणि नावीन्य काही वेगळेच आहे.

पहिल्याच वर्षी क्लब म्हणजे कुटुंबाचा आणि जीवनाचा एक खास भाग होऊन गेले.आम्ही फॅमिली ऑफ रोटरी या संकल्पनेशी पुर्णपणे जोडले गेलो आणि अजूनही या सगळ्याचा भरपूर आनंद घेत आहोत.त्याच वर्षी आदर्श गणेश मंडळ स्पर्धा सुरू झाली. आपला क्लब डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्सला को-होस्ट होता. आम्ही वर्षभर वेगवेगळ्या कार्यक्रमात सहभागी झालो. सगळ्यांनी खुप आत्मियता दाखवली. त्यामुळे अजूनही रोटरीचा हा प्रवास सुखकर चालू आहे.

धन्यवाद रोटरी !!

## रोटेरियन नितीन नाईक

सन २००२ साली रोटे. अभय भिसे यांच्या ओळखीने मी रोटरी क्लब जॉईन केला. त्यावर्षी रोटेरियन राम कुतवळ हे अध्यक्ष होते. त्या वर्षीची थीम सो द सीडस ऑफ लव मला अजूनही आठवते आणि क्लब मधले वातावरणही तसेच होते. सर्वांनी आपुलकी आणि प्रेमाने आम्हाला रोटरी परिवारात सामावून घेतले. क्लबमध्ये येण्याआधी मला अभय दादाने सांगितले की नितीन तुझ्या सर्व मित्रांची तू लिस्ट कर.. मी ती केली.. त्यांनी मला प्रत्येकाचे व्यवसाय विचारले. मी आर्किटेक्ट त्यामुळे माझे मित्र ही आर्किटेक्ट होते. मग अभय दादा मला म्हणाला.. अरे समाजामध्ये आपल्याला फक्त आर्किटेक्ट मित्र लागतात का..जीवनात वेगवेगळ्या व्यवसायातील लोकांचे सहकार्य घ्यावे लागते. त्याकरता त्यांची ओळख असावी लागते. मैत्री झाली तर आपले जीवन अधिक संपन्न होते आणि हे सर्व आपल्याला रोटरी देते. त्यामुळे मी लगेच क्लब जॉईन केलं आणि खरंच जी मैत्री होण्याकरता ५-१० वर्ष पण लागली असती अशी मैत्री मला रोटरी मध्ये एका वर्षाच्या आत मिळाली. त्याचे काही हृद्य अनुभव –

माझा भाऊ- वहिनी डेंग्यूमुळे हॉस्पिटलमध्ये होते. आम्ही खूप काळजीत होतो तेव्हा डॉक्टर महाजनांनी मला त्यांचे सर्व रिपोर्ट आणि दिली जाणारी ट्रीटमेंट ऐकून काळजीचे कारण नाही असे सांगितले तसेच तेथील डॉक्टरांशी बोलल्याने तिथे घरच्या सारखी काळजी घेतली गेली व आम्हाला खूप मोठा दिलासा मिळाला. एकदा मी कायद्याचा सल्ला घेण्याकरता आपले माजी सभासद ॲड. श्रीकांत कानिटकर यांच्याकडे गेलो. त्यांच्याकडे खूप गर्दी असायची. त्यांची वेळ मिळणे अवघड होते पण त्यांनी मला बाहेर प्रतीक्षा न करवता लगेच आत बोलावले. त्यांच्यासमोर एक क्लाइंट होता तर मला त्यांच्या खुर्चीशेजारी बसवून माझी अडचण समजून घेतली व कायदेशीर सल्ला दिला. अशी वागणूक दिलेली पाहून मला रोटरीचा सभासद असल्याचा अभिमान वाटतो.

## रोटेरियन हेमंत वाटवे

गेली तीन वर्ष मी रोटरी क्लब ऑफ पुणे कात्रज चा सभासद आहे. खरंतर कामाच्या व्यापामुळे मला क्लबच्या मीटिंगला यायला जमत नाही.

तरीही कात्रज क्लब हे माझे घर आहे आणि असे वाटणे हेच आपल्या क्लबच्या यशाचे रहस्य आहे. क्लब मधील सर्व मेम्बर्स उत्साही आहेत. क्लबमध्ये खूप छान छान कार्यक्रम असतात. आपल्या क्लबमधील स्वयंशिस्त वाखाणण्यासारखी आहे. प्रत्येकाच्या वैविध्यपूर्ण अनुभवातून व एकजुटीने छान सामाजिक उपक्रम राबवले जातात. रोटेरियन विवेक कुलकर्णी यांचा आपल्या क्लब विषयी असलेला जिव्हाळा आणि समाज उपयोगी कामाप्रती असणारी निष्ठा वाखाणण्यासारखी आहे. संपर्कात येणाऱ्या व्यक्तीशी मित्रत्वाच्या नात्याने सामाजिक ऋण दायित्व पार पाडण्यासाठी योग्य साथ देण्याची त्यांची कला, तळमळ याला माझा सलाम !! अशा अनेक ध्येयनिष्ठ- अनुभव संपन्न मेंबर्सनी माझा परिवार बनला आहे. या सगळ्यांसाठी मी रोटरीचा ऋणी आहे.

धन्यवाद रोटरी !!

असेच अनेक छान छान मित्र मला रोटरी मध्ये मिळाले.अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत व नंतर ही जिल्हा पातळीवर रोटरी मध्ये विविध जबाबदारी घेताना समाजातील वेगवेगळ्या प्रतिष्ठित लोकांची मैत्री झाली. रोटरी मुळे मला जीवन आनंदाचा ठेवा मिळाला.

धन्यवाद रोटरी!!

## रोटेरियन नमिता नाईक

आम्ही क्लब मध्ये रो. राम कुतवळ अध्यक्ष असताना जॉईन झालो. जसं जसे मीटिंग ला येत गेलो तश्या ओळखी वाढल्या. रोटरीचे काम कळले. आवडले आणि भावले. घरी आम्ही दोघेच होतो. पिनाक लहान होता. रोटरी च्या संस्कारात तोही मोठा होऊ लागला. त्यामुळे मी ही रोटरीची सभासद झाले. नवीन जबाबदाऱ्या घेतल्या आणि सर्वांच्या सहकार्याने पार पडल्या.

या प्रवासात मला खूप छान मैत्रिणी मिळाल्या. फेलोशिप, भिशी मला खूप आवडतात. सामाजिक काम केल्यावर मिळणारा आनंद अवर्णनीय असतो. या वर्षी युथ डायरेक्टर म्हणून काम करताना खूप शिकायला मिळाले. कोविडमुळे शाळांचे, मुलांचे प्रश्न कळले. त्यावर काम करायला आवडतं आहे.

एका छोट्याशा गावातून आलेली मी केवळ रोटरीमुळे आत्मविश्वासपूर्ण काम करत आहे. सामजिक कामातला आनंद समजला आणि संपन्न व्यक्तिमत्त्व मिळाले. खरी मी मला कळले.

धन्यवाद रोटरी !!

## काळजाचे पाणी आणि वाफ

साल १९९४. गिरनार यात्रेसाठी पासष्ट वर्षाची आई आणि साठीतल्या दोन मावशा पत्नीसह गेलेलो. पहाटे पाच वाजता सर्व जण पायी निघालो. गुडघे दुखीच्या तीन ज्येष्ठ महिला व चालण्याची अजिबात सवय नसलेली तरुण पत्नी. निम्मा प्रवास होइतो दोन वाजले. अंबाजींच्या दर्शनानंतर महिला वर्गाने जुनागढला परत जायचं ठरवलं. माझ्यातला ट्रेकर मात्र गप्प नव्हता. कसंही करून सात पर्वत पार करायचेच या निश्चयाने साडेपाचला दत्त महाराजांच्या पादुकांजवळ पोहोचलो. दर्शन निवांत झाले. मी एकटाच भक्त. एक नागा साधू धुनी पेटवून बसलेले. सकाळपासून थकल्या पायांना कुरवाळत बसलो तर साधूबाबा म्हटले.. बेटा इसी क्षण वापसी के लिये निकलो या यहाँ गुफामें रात निकालो और सुबह-सुबह जाऔ.आता सूर्य अस्ताला चालला होता. डोंगर खडकाळ ओकाबोका व मोठी विवरे असलेला होता. मधून एक पायवाट होती. मुख्य आलेला रस्ता लांबून होता. शॉर्टकट म्हणून मी पायवाटेला लागलो तेव्हा कांही पक्षी ऊंच उडत होते. जसा मी विवराजवळ पोहोचलो तसं ब-याच पक्षांनी माझ्यावर हल्ला केला. त्यांची अणकुचीदार नखे, चोची व त्यांच्या शरीराचा येणारा मृतशरीरासारखा दुर्गंध भयंकर होता. त्या हल्याने मी लडखडून विवरात पडलो. तिथल्या गिधाडाच्या पिलांना मी खाद्य वाटलो पण मोठ्या मानवी आकाराने घाबरले देखील. मी विवराच्या वर यायचा प्रयत्न करताना खरचटलेही. गिधाडे मात्र डोळ्यावर नेम धरुन भरा-या मारत होते. काळजाचं झालेलं पाणी पाणी आणि जीव मुठीत घेउन वाट फुटेल तसा पळत सुटलो. रस्ता कळेना डोंगर उतारावरुन पळत गीरच्या जंगलात पोहोचलो. अंगातला कंप थोडा कमी होतोय तोवर काठियावाडी आदिवासी कुटुंब दिसलं ते लगबगीनं चालले होते. त्याना काही विचारणार तेवढ्यात जवळूनच सिंहाची डरकाळी ऐकू आली. आता मात्र काळजाच्या पाण्याची वाफ झाली. अजिबात ओळख नसताना स्त्री पुरुष भेद सोडून आम्ही सर्वांनी एकमेकाना घट्ट मिठी मारली. असं झालं काळजाचं पाणी आणि त्याची वाफ.

**श्री. प्रदीप सिंदेकर पुणे.**

## पॉझिटिव एनर्जी

स्थल, कार्य, दिशा, उपयोग व भार यांचा विचार करणे स्थापत्य शास्त्रात सांकल्याने विचार केला जातो. वात्तू निर्मितीचे जे शास्त्र आहे त्याला वास्तूशास्त्र म्हणतात. पण प्रत्येकाला शास्त्रानुसार वास्तूनिर्मितीचे भाग्य लाभत नाही. सर्वसामान्यपणे आपले वसतीस्थान हे आपल्याला जे जसे आहे तसे मिळते हे मात्र आपल्या भाग्यानुसार मिळते असे मानायला वाव आहे. वास्तूशास्त्रानुसार वास्तूचा भाग्यावर परिणाम निश्चितपमै होतो. वास्तूतील रहिवाशांचा जन्म मृत्यू, लाभ, हानी यांचा वास्तूशी संबंध असतो. वास्तूच्या अंतर्गत रचनेच्या माध्यमातून दिशा व अंतर्गत कार्य यांचा परस्परसंबंध सकारात्मक व्हावा यासाठीही वास्तूशास्त्र उपयोगी पडते.

वास्तू रचना करताना पंचमहाभूते, अष्टदिशा व ब्रम्हस्थानाचा विचार केला जातो. रंग, रचना व दिशा यांचा एकत्रित विचार करुन घरात सकारात्मक आयाम निर्माण करता येऊ शकतात. किंवा वास्तूदोष घालवताही येऊ शकतात.वास्तूशास्त्रानुसार कोणतीही वास्तू शंभर टक्के बरोबर असू शकत नाही. त्याच्या दोष व लाभाचे विश्लेषण वास्तू शास्त्रज्ञ करु शकतो. वास्तूच्या सदस्यांचे सहकार्य यामध्ये गरजेचे असते. त्यांच्या दिनचर्येत आवश्यक ते बदल घडणे अपेक्षित असते.खरेतर प्लॉटची निवड हा खूप महत्त्वाचा मुद्दा असतो. प्लॉटचा आकार, मातीचा रंग, वास, आकार, उतार, चव इत्यादींवर पण ब-याच गोष्टी ठरतात. यासाठी बांधकाम तज्ञ, वास्तू तज्ञ व आर्किटेक्ट यांच्या समन्वयातून चांगली वास्तू उभारता येते. शिवाय वास्तूशास्त्रानुसार निर्माण करताना बीम कॉलम चुकीच्या जागी येऊन ब्रम्हस्थानात दोष येण्याचा धोकाही टळतो. निर्बंधित वस्तूंचा वापर टाळता येतो.वास्तू निर्मितीनंतरही अनावश्यक वस्तू, अडगळ तसेच विनावापर इलेक्ट्रॉनिक वस्तूचे अस्थानी ठेवणे टाळावे. स्वच्छता हा शुभ शक्तीचा आत्मा आहे. प्रवेश द्वारावर गणेश, लक्ष्मी किंवा शुभप्रतिमा लावाव्यात. यामुळेच सकारात्मक उर्जा अर्थात पॉझिटिव एनर्जीचा वास्तूमध्ये संचार राहतो.

**सौ. सुषमा पलंगे**

## RECEIPE

## Pumpkin Roasted chili Soup

– लाल भोपळा पाव किलो.

– बदाम २

– भाजलेली एक हिरवी मिरची.

– मीठ .

– थोड भगर पीठ.

लाल भोपळा बारीक कापुन तुपावर परतुन घेणे. एक वाफ आणणे.

मिक्सर भांड्यामधे लाल भोपळा, हिरवी मिरची, बदाम, थोडस पाणी घालुन वाटुन घ्यावे.

भांड गरम करुन त्यांत तुप घालुन जीरे टाकावे, बारीक केलेले मिश्रण टाकावे. भगर पीठ पाण्यात घोळुन त्यांत घालावे. एक उकळी द्यावी. गरम गरम वाढावे.

- Ann Manisha Tikone



## happy moments

**Rtn. Asmita Patil**
Joined Assetrak Solutions Pvt. Ltd. as Customer Experience Specialist.

**Rtn. Pradeep Sindekar**
Got appreciated for his poetries by 'Kavya Shilpa' sanstha

**Ann. Ketki Sindekar**
Joined Oriental Insurance Solapur Divisional office as a Senior Divisional Manager.

## Weekly meetings December 2021

R.Y. : 2021-22

**४ डीसेंबर**
संसारी लोणचं
स्वाती सुरंगळीकर

**१२ डीसेंबर**
बावर्ची डे

**१८ डीसेंबर**
बिझीनेस मिटींग

**२५ डीसेंबर**
ॲनेट्स नाईट आणि
ख्रिसमस सेलिब्रेशन

Rotary Club of Pune Katraj

Rotary

We meet every Saturday, 8 PM

## Happy Birthday!

### Birthdays December

| | | |
|---|---|---|
| Rtn. | Watve Hemant | 03-Dec |
| Anna | Kulkarni Digambar | 03-Dec |
| Annet | Palange Siddheshwar | 07-Dec |
| Rtn. | Durve Atul | 09-Dec |
| Annet | Bhisey Parikshit | 13-Dec |
| Annet | Mahajan Amruta | 17-Dec |
| Annet | Thatte Sneha | 18-Dec |
| Annet | Kale Prachi | 19-Dec |
| Annet | Gadkari Shivani | 23-Dec |
| Annet | Ghalsasi Amla | 25-Dec |
| Annet | Hirve Madhura | 27-Dec |
| Rtn. | Bhisey Abhay | 29-Dec |

## happy Anniversary

### Anniversarie December

| | |
|---|---|
| Rtn. Ganesh & Aparna Hadke | 01-Dec |
| Rtn. Megha & Sanjyot Tawade | 02-Dec |
| Rtn. Dr. Prabhakar & Jayshree Mahajan | 04-Dec |
| Rtn. Shashikant & Pushpa Bharati | 09-Dec |
| Rtn. Prasad & Deepali Gadkari | 15-Dec |
| Rtn. Dhananjay & Rtn. Varsha Hirwe | 15-Dec |
| Rtn. Atul & Swapna Durve | 29-Dec |
| Rtn. Kirti & Rajendra Bhansali | 31-Dec |